# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ०८/१०/२०२२ (शनिवार)**

**(दुपार)**

---

### अकस्मात मृत्यू

**१) पो.स्टे. वेलतुर :-** अंतर्गत २५ कि. मी. अंतरावरील मौजा भिवकुंड येथे दिनांक ०६/१०/२०२२ चे २१.०० वा. ते ०७/१०/२०२२ चे सकाळी ०९.३० दरम्यान **सुभाष अनंतलाल सलामे(मृतक), वय ३१ वर्ष, रा.भिवकुंड,ता. कुही** हा दि. ०६/१०/२०२२ रोजी सायंकाळी आपला भाऊ व मित्रासह चाफेगडी येथे बाजाराकरिता गेला व बाजार करून दारु पिवून घरी परत आला व जेवन करुन नेहमीप्रमाणे गावातील तलावाला लागून असलेल्या हनुमान मंदिरात झोपायला गेला असता दारुच्या नशेत तलावाच्या पाण्यात बुडून मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- अमित अनंतलाल सलामे, वय ३० वर्ष, रा.भिवकुंड,ता.कुही यांचे रिपोर्ट वरून पो. स्टे. वेलतुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा संजय पायक मो.नं. ८८३०९२३३१० हे करीत आहे.

**२) पो.स्टे. रामटेक :-** अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील उपजिल्हा रूग्णालय रामटेक, मौजा राधाकृष्ण वार्ड रामटेक येथे दिनांक ०७/१०/२०२२ चे १०.०० वा. दरम्यान **अकिलुर रहमान जमीलुर रहमान(मृतक), वय ६० वर्ष रा. न्यु येरखेडा सुपारे नगर कामठी** हे देणा बॅकेचे ईमारतीच्या वरच्या माळयावर एल.आय.सी.चे कार्यालय रामटेक येथे पैसे भरण्यास जात असतांना सिडी चढतांनी अचानक त्यांचे छातीत दुखत असल्याने व त्यांना घाबरल्यासारखे वाटत असल्याने उपचाराकरिता उपजिल्हा रूग्णालय रामटेक येथे नेले असता तेथिल डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले. यातील मृतक हा हृदय विकाराने मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- आकीबलुर रहमान वल्द अकिलुर रहमान, वय ३० वर्षे रा. न्यु येरखेडा सुपारे नगर कामठी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. रामटेक येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक योगेश भुरे मो.क्र. ७७२२००३६७३ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. नरखेड :-** अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील मौजा पारडी शिवार येथे दिनांक ०७/१०/२०२२ चे १७.०० वा. पुर्वी **ऋषिक श्रावन धुर्वे (मृतक), वय २२ वर्ष रा.वार्ड क्रं १७ नरखेड** हा मोबाईल गेम खेळण्याची सवई असल्याने त्याच्या मनावर परिणाम झाल्यामुळे तो पारडी शिवारात रवि रेवतकर यांचे शेता जवळ असलेल्या मुरूमचे खड्डयात जमा झालेल्या पाण्यात उडी घेवुन पाण्यात बुडुन मरण पावला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- क्रांतीक श्रावन धुर्वे, वय १९ वर्ष रा.वार्ड क्रं १७ नरखेड यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. नरखेड येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक दिनेश वरठे मो नं ९२८४२९५९२२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**